दिनांक :- ०९ एप्रिल २०२१

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## महानगरपालिका सभा क्रमांक - ०१ /२०२१-२०२२

## महानगरपालिका सभेची नोटीस (ऑनलाईन अँपद्वारे)

प्रति,
मा. ____________________
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मधील तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **सोमवार दि. १९/०४/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय, सांगली येथे मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दि.०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये ऑनलाईन अँपद्वारे आयोजित केली आहे.** या सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत. तरी आपण सदर सभेस ऑनलाईन सहभागी व्हावे हि विनंती.

**सदर ऑनलाईन (Zoom App) सभेसाठी मिटींग आयडी-४१५६८०३७९० पासवर्ड-१२३४५ असा आहे.**

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि.१०/०२/२०२१ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दु:खवठ्याचे ठराव. ब) अभिनंदनाचे ठराव.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिका मिरज शहरातील चिंच झाडांच्या चिंच फळांचा जाहिर लिलावा मधील सर्वात जास्त बोलीधारक श्री.आसिफ इस्माईल पठाण यांनी र.रु.१,३६,०००/- मात्र रक्कमेची दोनवार लिलाव बोली केली असून, सदर लिलाव बोलीस तीनवार अंतरावर मान्यता देणेकामी **शहर अभियंता (उद्याने विभाग) यांचे दि.२६/०२/२०२१ चे विषयपत्र.**

५. महानगरपालिका सांगली शहरातील मनपा मालकीच्या ओपन स्पेसमधील निलगिरी झाडांची २० फुट अंतरावरुन उंची कमी करणे जाहिर लिलावा मधील सर्वात जास्त बोलीधारक श्री.अरुण यशवंत लोंढे यांनी र.रु.३,११,०००/- मात्र रक्कमेची दोनवार लिलाव बोली केली असून, सदर लिलाव बोलीस तीनवार अंतरावर मान्यता देणेकामी **शहर अभियंता (उद्याने विभाग) यांचे दि.२६/०२/२०२१ चे विषयपत्र.**

६. महानगरपालिका क्षेत्रातील (१) आमराई उद्यानातील कवठ झाडांची फळे (२) चिंच झाडांची फळे (३) आमराई ते कॉलेज कॉर्नर पर्यतच्या चिंच झाडांची फळे (४) रि.स.नं.९९/१ सांगली येथील वार्षिक गवत लिलाव अशा चारही जाहिर लिलावा मधील सर्वात जास्त बोलीधारक श्री.असिफ इस्माईल पठाण यांचा अनुक्रमे (१)र.रु.१०००/-, (२) र.रु.२८,०००/-, (३) र.रु.११,०००/- आणि (४) श्री.सुरेश चौगुले यांचा र.रु.३९,०००/- मात्र प्रमाणे दोनवार लिलाव बोली केली असुन, सदर लिलाव बोलीस तीनवार अंतरावर मान्यता देणेकामी **शहर अभियंता (उद्याने विभाग) यांचे दि.२६/०२/२०२१ चे विषयपत्र.**

७. सन २०१९-२० व २०२०-२१ या वर्षाकरीता महापालिका क्षेत्रातील विविध प्रकारचे व्यवसायधारकांचे दंड माफ करुन, व्यवसाय परवाना फी भरुन घेणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.०३/०३/२०२१ चे विषयपत्र.**

८. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या २०१ स्वयंसेविका व एक गटप्रर्वतक यांना कोरोना कालावधी असेपर्यंत प्रतिमहा र.रु.५०००/- मात्र प्रोत्साहन भत्ता देणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.०१/०३/२०२१ चे विषयपत्र.**

९. महापालिका दिव्यांग सक्षमीकरण अभियानांतर्गत (D.E.P.) सन [illegible] या वर्षातील ५% दिव्यांग कल्या[illegible] निधीतून महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींना लग्नकार्यासाठी [illegible] मात्र व घरकुल बांधणेकरीता र.रु.१,००,०००/- मात्र अर्थसहाय्य करणेस धोरणात्मक मान्यता [illegible] (दिव्यांक कक्ष) यांचे **दि.१८/०२/२०२१ चे विषयपत्र.**

१०. महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाकरीता सक्षम अधिकारी व कर्मचारी [illegible] पदनिहाय एकूण १५ पदे नव्याने निर्मितीस व सदर पदाचे सेवा प्रवेश नियमाच्या मसुद्यास [illegible] प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.०४/०२/२०२१ चे [illegible]**

११. महानगरपालिकेच्या मिरज शहराच्या विकास योजना नकाशानुसार नियोजित ख्वॉजा वसाहत [illegible] महामार्गापर्यंत मिरज स.नं.७१० पैकी या जागेतून जाणाऱ्या ३०.४८ मी.(१०० फुटी) रुंदीचा रस्त्याचे [illegible] मान्यता देणेकामी **उपायुक्त (नगररचना विभाग मिरज) यांचे दि.२२/०१/२०२१ चे विषयपत्र.**

१२. स.नं.२५२/२(अ) संजयनगर अभयनगर, सांगली मधील मनपा खुली जागा येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र क्र.६ चे बांधकाम करणे कामाची जागा बदलुन सदरचे काम सि.स.नं.५१६६/२१ व सि.स.नं.५९१२ सांगली मधील मनपा खुली जागांपैकी एका जागेवर नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र क्र.६ चे बांधकाम करणेसाठी एका जागेची निश्चिती करणेस धोरणात्मक निर्णय घेणेकामी उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०७/०४/२०२१ चे विषयपत्र.

१३. महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान राबविणेकामी शासनाच्या जी.आर.प्रमाणे पदनिर्मितीस तसेच, हनुमान नगर ऑक्सीडेशन पॉईट व माळ बंगला ७० एम.एल.डी.जलशुद्धीकरण केंद्र,माधवनगर रोड,सांगली या दोन्ही जागा फायर स्टेशनसाठी आरक्षित करुन सदर जागांवर फायर स्टेशन बांधणेस व फायर टेंडर महापालिकेचा स्वहिस्सा घालून घेणेस तसेच, शासनाच्या दिलेल्या विहित नमुन्यामध्ये प्रतिज्ञापत्र मा.संचालक,महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचलनालय यांचेमार्फत मा.सचिव-२, नगरविकास विभाग यांचेकडे पाठविणेस मान्यता मिळणेकामी उपायुक्त (अग्नि व आणीबाणी) यांचे दि.०७/०४/२०२१ चे विषयपत्र.

१४. विधान परिषद स्थानिक आमदार निधीतून महानगरपालिकेने खरेदी केलेली रुग्णवाहिका ना नफा ना तोटा या तत्वावर सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका व आयुष सेवाभावी संस्था,सांगली यांचे संयुक्तीकरित्या कायमस्वरुपी चालविणेस देणेस मान्यता देणेकामी उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.०८/०४/२०२१ चे विषयपत्र.

१५. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

१६. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

मा.महापौरसो यांचे मान्यतेने वितरीत }

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**(टिप - *मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग* यांचेकडील दि.०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये कळविलेनुसार सदरची सभा ऑनलाईन ॲपद्वारे आयोजित केली असून, सदर ऑनलाईन सभेच्या प्रक्रियेसंदर्भात अधिक माहितीसाठी सन्मा.सदस्यांनी महापालिका सिस्टीम मॅनेंजर यांचेशी संपर्क साधावा ही विनंती.)**

**संपर्क क्रमांक :- श्री.नकुल जकाते सिस्टीम मॅनेंजर, भ्रमणध्वनी.क्र.९८२२१८५९२९**

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सूचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०१/२०२१-२०२२

## महापालिका सभा दिनांक १९/०४/२०२१ करीता.(ऑनलाईन ॲपद्वारे)

सोमवार दि.१९/०४/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय, सांगली येथे ऑनलाईन ॲपद्वारे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

**१. सौ.शुभांगी महेश साळुंखे यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका क्षेत्रातील उर्दू शाळा नं.३९ येथील शिक्षक विद्यार्थ्यांच्या करीता असलेले जुने प्रसाधन गृहाची दुरावस्था झाल्याने, शाळेत नविन प्रसाधन गृह बांधण्यात आलेले आहे. परंतू यालगत असलेले जुने प्रसाधन गृह पडण्याच्या अवस्थेत असून, यामुळे या शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचा धोका संभवत असून त्यापासून कोणतीही दुर्घटना घडू नये याकरीता हे जुने प्रसाधन गृह काढून टाकणे आवश्यक आहे. तरी सदरचा प्रस्तावावर चर्चा करुन सदरचे पडीक, दुरावस्था झालेले प्रसाधन गृह काढून टाकणेबाबत मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्ताव.

**२. श्री. जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका क्षेत्रात रयतेचे राजे छत्रपती राजर्षी शाहू महाराज तसेच स्त्री शिक्षणाचे जनक महात्मा जोतीबा फुले या महामानवांचे पुर्णाकृती पुतळे बसविणेबाबत यापुर्वी महासभेमध्ये ठराव पारित झालेला आहे. परंतु योग्य त्या जागेची उपलब्धता झाली नसले कारणामुळे सदरचे काम थांबलेले होते. सांगली शहरातील माता रमाई आंबेडकर उद्यान ते रेल्वे अंडरपास येथील दोन्ही रस्त्याच्या मधील (सि.स.नं. २६७/१+२ ब) ओपन स्पेसमध्ये या दोन्ही महामानवांची पुतळे उभे करण्याबाबत नागरीकांच्याकडून सातत्याने मागणी होत आहे. शिवाय विविध सामाजिक संघटना व पक्षांच्यावतीने महानगरपालिकेस पुतळे बसविणेबाबत निवेदने प्राप्त होत आहेत. तसेच दोन्ही पुतळ्याच्या मध्यभागी तथागतांच्या अभय मुद्रेतील हस्तमुद्रा बसविणेबाबत मागणी ही होत आहे. जनमताचा सन्मान करुन सदर ठिकाणी पुतळे बसविणे व तथागतांच्या अभयमुद्रेतील हस्तमुद्रा बसविणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

**३. श्री. विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका क्षेत्रा अंतर्गत वानलेसवाडी हद्दीमध्ये स्वामी समर्थ नगर नवीन वसाहत झालेली आहे. सदर वसाहतीची नोंद सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या रेकॉर्डला अद्यापी झालेली नाही. सदर स्वामी समर्थ नगर वसाहत ही रेल्वे लाईन पासून ते उत्तरेकडील सदगुरु नगर परिसर पर्यंत व जुना माधवनगर रोड (जुनी रेल्वे लाईन) पासून विजयनगर कुपवाड रोड पर्यंत विकसित झालेली आहे. त्यामुळे बाहेरुन येणारे नातेवाईक, पाहुणे मंडळी तसेच पत्रव्यवहार करणेसाठी परिसरातील नागरिकांना अडचणीचे होत आहे. तरी सदर स्वामी समर्थ नगर वसाहतीची नोंद सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या रेकॉर्डला लावूण सदर परिसरास स्वामी समर्थ नगर असे नांव देणेकामी आलेला प्रस्ताव.

**४. सौ. स्नेहल सचिन सावंत यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका क्षेत्रातील रमामाता नगर परिसरातील रमामाता नगर मित्र मंडळ, काळे प्लॉट ह्या मंडळाने सर्व्हे नं. ४४२/२ येथील महापालिकेची खुली जागा स्वच्छतेसाठी व वृक्षारोपन व त्याचे संगोपन करणेस दि.११/१२/२०१७ रोजी मा. आयुक्त खेबुडकर साहेब यांचेकडे मागणी परवानगी मागितली होती. मा. आयुक्त खेबुडकर साहेब यांनी दि.३०/१२/२०१७ रोजी रमामातानगर मित्र मंडळाच्या अध्यक्षांना काही शर्ती व अटी घालून वरील मागणीला परवानगी दिली होती. तरी सदर परवानगी देणेबाबत आलेला प्रस्ताव.

**५. सौ. वहिदा अय्याज नायकवडी यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.२ मधील १०० फुटी रोड, इदगाह झोपडपट्टी जंक्शन ते चौगुले मळा या पुर्व-पश्चिम ८० फुटी डि.पी. रस्त्यास स्व. डॉ. पतंगराव कदम यांचे नाव देणेबाबत नागरिकांतून मागणी होत असून त्यांनी त्यांच्या कारकिदीत जनहिताची केलेले कार्याची नागरिकांना सदैव प्रेरणा मिळावी तसेच त्यांच्या कार्याचे स्मरण कायम रहावे याकरीता वरील नमूद रस्त्यास स्वर्गीय डॉ. पतंगराव कदम मार्ग असे नामकरण करणेबाबत आलेला प्रस्ताव.

**६. सौ. वहिदा अय्याज नायकवडी यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.२ मधील मिरज एम.आय.डी.सी. गेस्ट हाऊस कोपरा ते माधवनगर बायपास १०० फुटी रस्त्यास लोकनेते स्वर्गीय राजारामबापू पाटील यांचे नाव देणेबाबत नागरिकांतून मागणी होत असून त्यांनी त्यांच्या कारकिदीत जनहिताची केलेले कार्याची नागरिकांना सदैव प्रेरणा मिळावी तसेच त्यांच्या कार्याचे स्मरण कायम रहावे याकरीता वरील नमूद रस्त्यास स्वर्गीय लोकनेते राजारामबापू पाटील मार्ग असे नामकरण करणेबाबत आलेला प्रस्ताव.

**७. सौ. स्नेहल सचिन सावंत यांनी दिलेला प्रस्ताव :-**

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सन्मा. सदस्या सौ. स्वाती सुरेश पारधी ह्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या घड्याळ या चिन्हावर अनुसुचित जमाती प्रवर्गातून निवडूण आलेल्या आहेत. मा. अर्जुन बन्ने सदस्य सचिव, जिल्हा
दक्षता नियंत्रण समिती तथा सहाय्यक आयुक्तसो समाजकल्याण सांगली यांचेकडील पत्र जा.क्र.सआसकसां/मावक/अजाआज(अप्र) अधि./२०२०-२१/५५७ दिनांक:-१२/०२/२०२१ रोजीच्या पत्रामध्ये समाजकल्याण समितीमधील अनुसुचित जातीच्या सदस्यासह अनुसुचीत जमातीच्या सदस्यांचा समावेश होणे आवश्यक आहे असे सुचित केले आहे. तरी सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या समाजकल्याण समितीमध्ये सन्मा. सदस्या सौ. स्वाती सुरेश पारधी यांचा समाविष्ट करणेसाठी आलेला प्रस्ताव.

**८. सौ. आरती रविंद्र वळवडे यांनी दिलेला प्रस्ताव :-**

सहकार तपस्वी मा. खासदार स्व. गुलाबराव पाटील यांचे हे जन्मशताब्दी वर्ष ( १६ सप्टेंबर, २०२० ते १६ सप्टेंबर २०२१) आहे. स्व. गुलाबराव पाटील साहेब हे सांगली नगरीचे नगरसेवक व १९५४ ते १९५५ मध्ये नगराध्यक्ष होते. त्यांच्या कार्यकाळात हिराबाग वॉटर वर्कस्ची पाण्याची जिवनदायी योजना सांगली साठी उभारणी करण्यात आली. सांगली नगरीच्या अनेक विविध समस्या त्यांनी सोडविल्या आणि शहरातील नागरिकांच्या सोईकडे लक्ष देवून तत्कालीन एक लोकप्रिय नगराध्यक्ष म्हणून नावारुपाला आले. पुढे ते राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील विविध क्षेत्रात कार्यरत राहिले. अशा एका तपस्वी लोकनेत्याची आठवण चिरंतन राहण्याकरीता त्यांची जयंती (१६ सप्टेंबर) व पुण्यतिथी (२१ जानेवारी) रोजी घेणेकरीता महासभेमध्ये ठराव पारित करावा याकामी आलेला प्रस्ताव.

--२--

९. श्री. शेडजी सुबराव मोहिते व श्री. विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील तरुण भारत स्टेडियम समोरील स.नं. १०८६ या मनपाच्या खुल्या जागेत लोकनेते राजारामबापू पाटील यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणेकामी मा. महासभा क्र.०१/२०२०-२१ दि.१६/०७/२०२० विषय क्र.०७ ला अनु- उपसूचनेव्दारे ठराव क्र.१० पारित केलेला होता. परंतू, सदर स.नं. १०८६ या मनपा खुल्या जागेवरील पूर्वी असलेल्या गोकूळ नाट्यगृह जागेबाबत मुंबई उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका नं.१२६७९/२०१५ चा दावा सुरु आहे. तसेच सदरील जागा मुख्य वर्दळीच्या ठिकाणी असलेमुळे वाहतुकीस ही मोठ्याप्रमाणात अडचणी निर्माण होणार आहे. तरी तरुण भारत स्टेडियम समोरील स.नं. १०८६ या मनपा खुल्या जागे ऐवजी स्टेशन रोड वरील स.नं.३४१ या मनपा जागेमध्ये लोकनेते राजारामबापू पाटील यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणे व पुतळा परिसर सुशोभिकरण करणेकामी मनपा पॅनेलवरील वास्तुविशारद यांचेकडून सदरची कामगिरी करुन घेणेस व त्या अनुसरुन वास्तुविशारद यांची फी व इतर अनुषंगिक येणारे खर्चास मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

१०. सौ. वहिदा अय्याज नायकवडी यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका प्रशासनातील अनेक कर्मचाऱ्यांना कामाच्या सोयी करीता प्रभारी अधिकार देणेत येत असतात. तसेच प्रत्येक विभागामध्ये विभाग प्रमुख नेमताना ते त्यांच्या तांत्रिक किंवा शैक्षणिक पात्रता व अर्हता तसेच त्यांच्या सेवाजेष्ठता यांच्या अनुषंगाने करणे आवश्यक आहे. परंतू अनेक ठिकाणी सेवाजेष्ठता, शैक्षणिक पात्रता व अर्हता यांचा विचार न करता पदभार दिलेले दिसून येतात. तसेच तात्पुरत्या स्वरुपात दिलेले नेमलेले किंवा मानधनावर असलेले कर्मचारी यांना बेदरकार अधिकार बहाल केलेचे दिसून येते ही बाब महापालिकेच्या हिताची नाही तसेच ती नैतिक अधिष्ठानात बसत नाही. सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ मधील पोट कलम १ व २ मधील तरतूदींचे काटेकोर पालन करणेत यावे. "प्रत्येक विभागामध्ये विभाग प्रमुख नेमताना ते त्यांच्या तांत्रिक किंवा शैक्षणिक पात्रता व अर्हता तसेच त्यांच्या सेवाजेष्ठता यांचे मूल्यमापन करुन, नियुक्ती करणेत याव्यात. तसेच त्यांना प्रशासकीय व आर्थिक अधिकार प्रदान करणेत यावेत. याबाबत मा. महापौर यांना याबाबत अवगत करणेत यावे याबाबत आलेला प्रस्ताव.

११. श्री. अतहर इद्रिस नायकवडी यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका मिरज शहरात एकमेव असे फिश मार्केट अस्तित्वात आहे. या ठिकाणी मिरज नगरपरिषद असल्यापासून सामाजिक कार्यकर्ते मरहुम. हाजी बरकतअली पठाण हे मच्छी विक्रीचा व्यवसाय करीत होते. व्यवसाय बरोबर सामाजिक बांधिलकी देखील जपत गरजू लोकांना दवाखाना, अनाथ मुलींच्या लग्नाला मदत करणे असे अनेक सामाजिक हिताचे उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या सामाजिक कामांची प्रेरणा आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना नक्कीच उत्तेजीत करणारी असेल म्हणून मिरज मिरासाहेब दर्गा कमान मार्गावार असणारे मटण मार्केटच्या पश्चिम बाजु असणारे फिश मार्केटला हाजी बरकतअली पठाण फिश मार्केट असे नामकरण कामी आलेला प्रस्ताव.

१२. श्री. शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये लोकसंख्येची वाढ झपाट्याने झालेली असून कुपवाड शहरामध्ये औद्योगीक वसाहत लगत असलेले कामगार वर्ग जास्त प्रमाणात आहे तसेच सद्या चालु असलेल्या कोरोना साथीच्या रोगाच्या पार्श्वभूमीवर सदर दवाखान्याची आवश्यकता लक्षात घेता अजून एक कम्युनिटी हेल्थ सेंटरची आवश्यकता आहे. कुपवाड स.नं.१७९ (जुना ४५९/२ अ + २ ब आणि ४५९/२ ब + ३ ते ५) मनपा खुली जागा येथे कम्युनिटी हेल्थ सेंटरचे बांधकाम उपलब्ध जागेच्या क्षेत्रफळानुसार G + १ (ग्राऊंड फ्लोअर + १st फ्लोअर) चे डिझाईन व इस्टीमेट तयार करणेकामी मनपा पॅनेलवरील वास्तुविशारद यांचेकडून सदरची कामगिरी करुन घेणेस व त्या अनुसरुन वास्तुविशारद यांची फी व इतर अनुषंगिक येणारे खर्चास मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

१३. श्री. गजानन रामु मगदूम यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या कुपवाड शहराचे सुप्रसिध्द वस्ताद " पै. शंकर (बापू) नायकू कोकरे" यांचे दि.१९/०२/२०२१ रोजी वयाच्या ६५ व्या वर्षी हृदयविकाराने दुःखद निधन झाले. कुस्ती क्षेत्रात त्यांचा मोठा दबदबा होता. उत्तम कुस्ती पट्टू म्हणून संपूर्ण राज्यामध्ये ओळखलं जात होते. त्यांनी त्यांचे ह्यातीमध्ये श्री महादेव तालीम कुपवाड च्या माध्यमातून अनेक उत्तम कुस्ती पट्टू घडविले आहेत. खेळा बरोबरच त्यांनी राजकीय क्षेत्रातील अनेक जबाबदाऱ्या सांभाळल्या होत्या. त्यांची किर्ती भाविपिढीस प्रेरणादायी ठरावी यासाठी त्यांच्या नावाचे स्मरण होणे गरजेचे आहे. यासाठी कुपवाड मेन रोड वरुन बामणोलीकडे जाणाऱ्या रस्त्यावरील असणाऱ्या त्यांच्या निवासस्थानाजवळ असणाऱ्या चौकास "पै. शंकर (बापू) नायकू कोकरे चौक" असे नामकरण करणेबाबत आलेला प्रस्ताव.

१४. श्री. शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेला प्रस्ताव:-

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०१९-२० मधील शासनाकडून १० कोटी प्राप्त झाले होते. त्या रक्कमेमधून आरक्षित वॉर्डातील विकासकामांची जाहिर निविदा काढण्यात आली होती. त्या निविदेमधील स्पर्धात्मक दरातून ७६,१०,२५७/- शिल्लक राहिली होती त्यातील ६७,११,६७७/- इतक्या रक्कमेची विकासकामे मा. आयुक्तसो यांच्या मान्यतेने मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पुढील मान्यतेसाठी पाठविले आहेत. त्यामुळे ८,९८,५८०/- इतकी रक्कम शिल्लक आहे. तरी सदरच्या रक्कमेमधून विकासकामे मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणेबाबत आलेला प्रस्ताव.

---

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक : १५/०४/२०२१.

महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१**

दिनांक :- १९/०४/२०२१

ठराव क्रमांक :- ०८

विषय क्रमांक :- ०४

---

सोबतचे शहर अभियंता (उद्यान विभाग) यांचे दि.२६/०२/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका मिरज शहरातील चिंच झाडांच्या चिंच फळांचा जाहिर लिलावा मधील सर्वात जास्त बोलीधारक श्री.आसिफ इस्माईल पठाण यांनी र.रु.१,३६,०००/- मात्र रक्कमेची दोनवार लिलाव बोली केली असून, सदर लिलाव बोलीस तीनवार अंतरावर विषयपत्रातील शिफारसीनुसार ही सभा मान्यता देत असून याकामी पुढील कार्यवाही मा. आयुक्तसो यांचे स्तरावर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. उत्तम साखळकर.

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

अनुमोदक :- श्री. उमेश पाटील.

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०४/२०२१

ठराव क्रमांक :- ०९

विषय क्रमांक :- ०५

---

सोबतचे शहर अभियंता (उद्यान विभाग) यांचे दि.२६/०२/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका सांगली शहरातील मनपा मालकीच्या ओपन स्पेसमधील निलगिरी झाडांची २० फुट अंतरावरुन उंची कमी करणे जाहिर लिलावा मधील सर्वात जास्त बोलीधारक श्री.अरुण यशवंत लोंढे यांनी र.रु.३,११,०००/- मात्र रक्कमेची दोनवार लिलाव बोली केली असून, सदर लिलाव बोलीस तीनवार अंतरावर विषयपत्रातील शिफारसीनुसार ही सभा मान्यता देत असून याकामी पुढील कार्यवाही मा. आयुक्तसो यांचे स्तरावर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. उन्नम खारककर. ठराव सर्वानुमते मंजुर

Dr. Suryavanshi

अनुमोदक :- श्री. उमेश पाटील. महापौर,

शहर अभियंता (उद्यान)

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- १९/०४/२०२१

**महासभा क्रमांक :- ०१**

ठराव क्रमांक :- १०

विषय क्रमांक :- ०६

---

सोबतचे शहर अभियंता (उद्यान विभाग) यांचे दि.२६/०२/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील (१) आमराई उद्यानातील कवठ झाडांची फळे (२) चिंच झाडांची फळे (३) आमराई ते कॉलेज कॉर्नर पर्यतच्या चिंच झाडांची फळे (४) रि.स.नं.९९/१ सांगली येथील वार्षिक गवत लिलाव अशा चारही जाहिर लिलावा मधील सर्वात जास्त बोलीधारक श्री.असिफ इस्माईल पठाण यांचा अनुक्रमे (१) र.रु.१०००/-, (२) र.रु.२८,०००/-, (३) र.रु.११,०००/- आणि (४) श्री.सुरेश चौगुले यांचा र.रु.३९,०००/- मात्र प्रमाणे दोनवार लिलाव बोली केली असून, सदर लिलाव बोलीस तीनवार अंतरावर विषयपत्रातील शिफारसीनुसार ही सभा मान्यता देत असून याकामी पुढील कार्यवाही मा. आयुक्तसो यांचे स्तरावर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. उत्तम साखळकर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. उमेश पाटील

महापौर,

शहर अभियंता (उद्यान)

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१

ठराव क्रमांक :- ११

दिनांक :- १९/०४/२०२१

विषय क्रमांक :- ०७

---

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.०३/०३/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सन २०१९-२० व २०२०-२१ या वर्षाकरीता महापालिका क्षेत्रातील विविध प्रकारचे व्यवसायधारकांचे दंड माफ करुन, व्यवसाय परवाना फी भरुन घेणेस मान्यता मिळणेकामी आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झालेल्या चर्चेस अनुसरुन ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रामध्ये विविध प्रकारचे व्यवसाय कामी मार्केट लायसन्स परवाने नुतनीकरणकामी कोणताही दंड न आकारता फक्त व्यवसाय विक्री परवाना फी घेऊन परवाने नुतनीकरण करुन देणेत यावी अशी मागणी सांगली जिल्हा केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन, सांगली यांनी केलेली आहे. तसेच एकदम ५ वर्षाची फी भरुन ही घेणेची मागणी होत आहे. त्याचबरोबर सन २०१९-२० मध्ये कृष्णा नदीस आलेला महापूर, सन २०२० मध्ये कोविड-१९ महामारी यामुळे व्यवसायधारकांचे झालेले आर्थिक नुकसान याचा विचार करुन सन २०१९-२० व २०२०-२१ या आर्थिक वर्षाची मार्केट लायसन्स दंड माफ करणेची मागणी विचारात घेऊन ही सभा महापालिका क्षेत्रातील सर्व व्यवसायधारकांचे सन २०१९-२०, २०२०-२१ व सन २०२१-२२ या ३ वर्षाकरीता मार्केट लायसन्स नुतनीकरणकामी दंड माफ करणेस मान्यता देत असून ज्या व्यवसायधारकांना आपली आगाऊ नुतनीकरण फी भरणेची असेल त्यांना आवश्यक बंधपत्र घेऊन ५ वर्षापर्यंतची फी एकदम भरुन घेणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (सही) श्री. शेडजी मोहिते

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (सही) सौ. वर्षा निंबाळकर

(सही)
महापौर,

(सही)
महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१**

दिनांक :- १९/०४/२०२१

ठराव क्रमांक :- १२

विषय क्रमांक :- ०८

---

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.०१/०३/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

राष्ट्रीय आरोग्य अभियांनातर्गत कार्यरत असलेल्या २०१ आशा स्वयंसेविका यांना कोरोना कालावधी असेपर्यत प्रतिमहा र.रु.५०००/- मात्र व एक गटप्रर्वतक यांना रु.१०,०००/- अतिरिक्त भत्ता देणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदीमधून होणेचा आहे.

उक्त विषयास अनुसरुन सन्मा.सदस्य श्री.शेडजी सुबराव मोहिते, श्री.संजय नायकू मेंढे, श्री.अतहर इद्रिस नायकवडी यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या आर.सी.एच.अंतर्गत कार्यरत असलेल्या ४१ कर्मचाऱ्यांना खालील प्रमाणे त्यांचे नावासमोर नमुद केलेप्रमाणे वेतनवाढ देणेस ही सभा मान्यता देत आहे.

| अ.क्र. | पदनाम व पदसंख्या | दर महा वेतनवाढ |
|---|---|---|
| १. | वैद्यकिय अधिकारी - पदसंख्या - ७ | ३२,०००/- |
| २. | प्रोग्राम मॅनेंजर - पदसंख्या - १ | २५,०००/- |
| ३. | लॅब टेक्नीशन - पदसंख्या - २ | १२,०००/- |
| ४. | ए.एन.एम. - पदसंख्या - १८ | १२,०००/- |
| ५. | अकौन्टंट - पदसंख्या - १ | २०,०००/- |
| ६. | डाटा एन्ट्री ऑपरेटर - पदसंख्या - १ | १२,०००/- |
| ७. | लिपीक - पदसंख्या - २ | १२,०००/- |
| ८. | शिपाई - पदसंख्या - ८ | ८०००/- |

उक्त विषयास अनुसरुन सन्मा.सदस्या सौ.रोहिणी सत्यजीत पाटील व सौ.शुभांगी महेश साळूंखे यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेच्या बालवाडी सेविकांना सद्या रु.३०००/- इतके मानधन देणेत येत आहे. सदर मानधनात रु.३०००/- वाढ करुन, महापालिकेच्या ६३ बालवाडी सेविकांना मानधन प्रतिमहा रु.६०००/- इतके करणेस ही सभा मान्यता देत आहे.

महापालिका सचिव
मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचक :- श्री. शेडजी मोहिते

अनुमोदक :- सौ. वर्षा निंबाळकर

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०४/२०२१

ठराव क्रमांक :- १३

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे उपायुक्त (दिव्यांग कक्ष) यांचे दि.१८/०२/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका दिव्यांग सक्षमीकरण अभियानांतर्गत (D.E.P.) सन २०२०-२१ या वर्षातील ५% दिव्यांग कल्याण निधीतून महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींना लग्नकार्यासाठी रु.५०,०००/- मात्र व घरकुल बांधणेकरीता र.रु.१,००,०००/- मात्र अर्थसहाय्य करणेस विषयपत्रातील शिफारसीनुसार ही सभा मान्यता देत आहे. तसेच महापालिकेच्या दिव्यांग कक्षाकडे कायमपणे पूर्णवेळ कर्मचारी नियुक्त करावे अशी सभा आदेशीत करीत असून महापालिकेच्या दिव्यांग विभागासाठी एक दिव्यांग समिती गठीत करावी अशी ही सभा सुचित करीत असून सदर समितीमध्ये सर्व पक्षीय सदस्यांचा समावेश करण्यात यावा. त्याचप्रमाणे महापालिका क्षेत्रातील दिव्यांग खेळाडूंसाठी विशेष भत्ता देणेबाबतचा प्रस्ताव मा. महासभेकडे सादर करावा असे ही सभा आदेशीत करीत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदीमधून होणेचा आहे.

सूचक :- (सही) श्री. उत्तम साखळकर ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (सही) श्री. उमेश पाटील. (सही) महापौर,

दिव्यांग कक्ष प्रमुख

(सही)

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०४/२०२१

ठराव क्रमांक :- १४

विषय क्रमांक :- १०

---

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.०४/०२/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाकरीता खालीलप्रमाणे एकूण १५ पदे नव्याने निर्माण करणेस व सदर पदाचे सेवा प्रवेश नियमाच्या मसुद्यास मा.शासनाची मंजूरी मिळणेकरीता मा. शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

| अ.क्र. | पदनाम | पद संख्या |
|---|---|---|
| १. | विशेष कार्यकारी अधिकारी, प्रादेशीक आपत्ती व्यवस्थापन केंद्र | १ |
| २. | अधिक्षक | १ |
| ३. | वरिष्ठ लिपीक | १ |
| ४. | कनिष्ठ लिपीक/संगणक चालक | १ |
| ५. | डाटा एंट्री ऑपरेटर | ४ |
| ६. | वाहनचालक | १ |
| ७. | शिपाई / हरकामी | ६ |
| | एकूण | १५ |

मा. शासनाने सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेमध्ये ५ जिल्ह्यासाठीचे प्रादेशीक आपत्ती व्यवस्थापन केंद्र सुरु केलेले असून सदर आपत्ती व्यवस्थापन केंद्रासाठी वरील १५ अधिकारी कर्मचारी यांची नियुक्ती करावी लागणार असलेने मा. शासनाकडून सदर अधिकारी कर्मचारी यांचे वेतन व भत्तेसाठी अनुदान मिळावे यासाठी मा. शासनाकडे अनुदान मागणी करणेस ही सभा प्रशासनास आदेशीत करीत आहे.

सूचक :- (सही) श्री. उत्तम साखळकर

ठराव सर्वानुमते मंजुर

(सही)

अनुमोदक :- (सही) श्री. उमेश पाटील

महापौर,

नेव

महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०४/२०२१

ठराव क्रमांक :- १५

विषय क्रमांक :- ११

---

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग, मिरज) यांचे दि.२२/०१/२०२१ व दि.१८/०३/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या मिरज शहराच्या विकास योजना नकाशानुसार नियोजित ख्वॉजा वसाहत ते मिरज कोल्हापूर महामार्गापर्यत मिरज स.नं.७१० पैकी या जागेतून जाणाऱ्या ३०.४८ मी. (१०० फुटी) रुंदीचा रस्त्याचे भूसंपादन करणेकामी सहा.दुय्यम निबंधक वर्ग १ यांचेकडून सन २०२०-२१ सालातील दरपत्रक मागवून त्यानुसार जागेचे मुल्यांकन करण्यात आले असून त्यानुसार मिळकत क्र.७१०/अ व ७१०/२ मिळकतधारक श्री. अब्दुलरहिमान अब्दुलकरीम शेख व इतर यांचे रस्ता रुंदीने बाधीत होणारे क्षेत्र ८३० चौ.मी. साठी मुल्यांकन रक्कम + १००% दिलासा रक्कम + व्याज यासह र.रु.२३,०५,०७६/- मात्र तसेच मिळकत क्र.७१०/ब श्री. अब्दुलअजीज शरीकमसलत व इतर मिळकतधारक यांची रस्ता रुंदीने बाधीत होणारे क्षेत्र ८०० चौ.मी. साठी मुल्यांकन रक्कम + १००% दिलासा रक्कम + व्याज यासह र.रु.२२,२१,७६०/- अशी एकूण रुपये ४५,२६,८३६/- मात्र अथवा प्रत्यक्ष भरपाई अदा करतेवेळी भूसंपादन अधिकारी यांनी निश्चित केलेल्या मुल्यांकनानुसार भरपाई रक्कम अदा करुन भूसंपादन करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. शेडजी मोहिते ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ. वर्षा निंबाळकर

Dr. Suryavanshi
महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०४/२०२१

ठराव क्रमांक :- १६

विषय क्रमांक :- १२

---

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०७/०४/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

स.नं.२५२/२(अ) संजयनगर अभयनगर, सांगली मधील मनपा खुली जागा येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र क्र.६ चे बांधकाम करणे कामाची जागा बदलुन सदरचे काम सि.स.नं.५१६६/२१ व सि.स.नं.५९१२ सांगली मधील मनपा खुली जागांपैकी एका जागेवर नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र क्र.६ चे बांधकाम करणेसाठी एका जागेची निश्चिती करणेबाबत सभागृहामध्ये झालेल्या चर्चेनुसार नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र क्र.६ चे बांधकाम सि.स.नं.५१६६/२१ या जागेवर करणेस ही सभा मान्यता देत असून सदर जागा बदलाबाबत आवश्यकत्या सक्षम प्राधिकरणाच्या तांत्रिक मान्यता घेणेची जबाबदारी प्रशासनावर राहणार आहे.

सूचक :- सौ कांचन उ कांबळे
सौ. कांचन कांबळे

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. उमेश पाटील

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०४/२०२१

ठराव क्रमांक :- १७

विषय क्रमांक :- १३

---

सोबतचे उपायुक्त (अग्नि व आणीबाणी) यांचे दि.०७/०४/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००९ हा दि.२३/०६/२००९ पासून महापालिका क्षेत्रामध्ये लागू करणेत आलेला असून, त्यानुसार महाराष्ट्र अग्नि सुरक्षा अभियानामध्ये सहभागी होणेस तसेच, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियमानुसार अग्निशमन सेवेतील तूट भरुन काढणे व अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करणे करीता या अभियानांतर्गत नविन फायर स्टेशन बांधणे, अग्निशमन केंद्राचे सक्षमीकरण करणे व नविन फायर टेंडर साहित्यासह खरेदी करणे आवश्यक आहे.

यानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये हनुमान नगर ऑक्सीडेशन पाँइन्ट (स.नं.३३४ पैकी ) व माळबंगला जलशुद्धीकरण केंद्र (स.नं.१८० पैकी व स.नं.२०२ पैकी) येथे महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानातून अग्निशमन केंद्र बांधणेस, अभियानातून अनुज्ञेय वाहने खरेदी करणेस व महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानाबाबतचा शासन निर्णय दि.३१ ऑगस्ट २००९ नुसार आवश्यक पदनिर्मिती करणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच, यासर्व बाबींसाठी व महाराष्ट्र अग्नि सुरक्षा अभियानाच्या निकषानुसार योग्य स्वहिस्सा उभारणेस व भरणेसही ही सभा मान्यता देत आहे. यासोबत महाराष्ट्र अग्नि सुरक्षा अभियान सहभागाच्या सर्व अटी शर्तीही ही सभा मान्य करीत आहे.

यानुसार परिपुर्ण प्रस्ताव प्रशासनाने तात्काळ नगरविकास विभाग व संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचलनालय यांचेकडे सादर करावा.

सूचक :- [signature] श्री.शेडजी मोहिते. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- [signature] सौ. भारती निंबाळकर. [signature] महापौर,

प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी [signature]

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०४/२०२१

ठराव क्रमांक :- १८

विषय क्रमांक :- १४

---

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.०८/०४/२०२१ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

विधान परिषद स्थानिक आमदार निधीतून मा. आमदार दिवाकरजी रावते यांनी सन २०२०-२१ स्थानिक निधी अंतर्गत र.रु.१८ लक्ष महापालिकेस रुग्णवाहिका खरेदी करणेसाठी मंजूर केला होता. त्यामधून महानगरपालिकेने खरेदी केलेली रुग्णवाहिका ना नफा ना तोटा या तत्वावर सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका व आयुष सेवाभावी संस्था,सांगली यांचे संयुक्तीक विद्यमाने कायमस्वरुपी चालविणेस आयुष सेवाभावी संस्थेस देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सदर रुग्णवाहिकेचा वापर नागरिकांना रुग्णालयात पोहचविणे व रुग्णालयातून ने-आण करणेसाठी होणार आहे. सदर रुग्णवाहिकेस कार्डियक्ट सुविधा आयुष सेवाभावी संस्था स्वखर्चाने करणार आहे. तसेच रुग्णवाहिका देखभाल दुरुस्ती, चालक पगार, इंधन खर्च, वाहन विमा इ. खर्चही सदर आयुष सेवाभावी संस्था करणार आहे. तसेच सदर रुग्णवाहिकेचा कोणताही अपघात झालेस त्याची सर्वस्वी जबाबदारी ही आयुष सेवाभावी संस्थेची राहणार असून सदरची रुग्णवाहिका आयुष सेवाभावी संस्थेस चालविणेस देणेकामी प्रशासनाने सदर संस्थेबरोबर महापालिकेच्या शर्ती अटीनुसार करारपत्र करणेचे असून सदर रुग्णवाहिकेचा लाभ जास्तीत जास्त गरीब व गरजू रुग्णांना होईल याची दक्षता प्रशासनाने घेणेची आहे. तसेच सदर रुग्णवाहिका संदर्भात कोणतेही शुल्क आकारणेचे झालेस त्याबाबत चर्चा करुन निर्णय घेणेकामी व कमीत कमी व किमान शुल्क आकारली जाईल यासाठी ही सभा महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे.

सूचक :- श्री. उत्तम साखळकर. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. उमेश पाटील.

Dr. Suryavanshi

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०४/२०२१

ठराव क्रमांक :- १९

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ. शुभांगी महेश साळुंखे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील उर्दू शाळा नं.३९ येथील शिक्षक विद्यार्थ्यांच्या करीता असलेले जुने प्रसाधन गृहाची दुरावस्था झाल्याने, शाळेत नविन प्रसाधन गृह बांधण्यात आलेले आहे. परंतू यालगत असलेले जुने प्रसाधन गृह पडण्याच्या अवस्थेत असून, यामुळे या शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचा धोका संभवत असून त्यापासून कोणतीही दुर्घटना घडू नये याकरीता हे जुने प्रसाधन गृह काढून टाकणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. उत्तम साखळकर. ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

अनुमोदक :- श्री. उमेश पाटील. महापौर,

सह आयुक्त प्र.स.क्र. १

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०४/२०२१

ठराव क्रमांक :- २०

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रात रयतेचे राजे छत्रपती राजर्षी शाहू महाराज तसेच स्त्री शिक्षणाचे जनक महात्मा जोतीबा फुले या महामानवांचे पुर्णाकृती पुतळे बसविणेबाबत यापुर्वी महासभेमध्ये ठराव पारित झालेला आहे. परंतु योग्य त्या जागेची उपलब्धता झाली नसले कारणामुळे सदरचे काम थांबलेले होते. सांगली शहरातील माता रमाई आंबेडकर उद्यान ते रेल्वे अंडरपास येथील दोन्ही रस्त्याच्या मधील (सि.स.नं. २६७/१+२ ब) ओपन स्पेसमध्ये या दोन्ही महामानवांची पुतळे उभे करण्याबाबत नागरीकांच्याकडून सातत्याने मागणी होत आहे. शिवाय विविध सामाजिक संघटना व पक्षांच्यावतीने महानगरपालिकेस पुतळे बसविणेबाबत निवेदने प्राप्त होत आहेत. तसेच दोन्ही पुतळ्याच्या मध्यभागी तथागतांच्या अभय मुद्रेतील हस्तमुद्रा बसविणेबाबत मागणी ही होत आहे. जनमताचा सन्मान करुन सदर ठिकाणी पुतळे बसविणे व तथागतांच्या अभयमुद्रेतील हस्तमुद्रा बसविणेकामी मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. उत्तम साखळकर. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. शेडजी मोहिते. D. Suryavanshi

महापौर,

सभा कामकाज व्यवस्थापक

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०४/२०२१

ठराव क्रमांक :- २१

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रा अंतर्गत वानलेसवाडी हद्दीमध्ये स्वामी समर्थ नगर नवीन वसाहत झालेली आहे. सदर वसाहतीची नोंद सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या रेकॉर्डला अद्यापी झालेली नाही. सदर स्वामी समर्थ नगर वसाहत ही रेल्वे लाईन पासून ते उत्तरेकडील सदगुरु नगर परिसर पर्यंत व जुना माधवनगर रोड (जुनी रेल्वे लाईन) पासून विजयनगर कुपवाड रोड पर्यंत विकसित झालेली आहे. त्यामुळे बाहेरुन येणारे नातेवाईक, पाहुणे मंडळी तसेच पत्रव्यवहार करणेसाठी परिसरातील नागरिकांना अडचणीचे होत आहे. तरी सदर स्वामी समर्थ नगर वसाहतीची नोंद सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या रेकॉर्डला लावूण सदर परिसरास स्वामी समर्थ नगर असे नांव देणेकामी मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. उत्तम साखळकर

ठराव सर्वानुमते मंजुर

D f Suryavanshi

अनुमोदक :- श्री. विष्णू माने.

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०४/२०२१

ठराव क्रमांक :- २२

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.स्नेहल सचिन सावंत यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील रमामाता नगर परिसरातील रमामाता नगर मित्र मंडळ, काळे प्लॉट ह्या मंडळाने सर्व्हे नं. ४४२/२ येथील महापालिकेची खुली जागा स्वच्छतेसाठी व वृक्षारोपन व त्याचे संगोपन करणेस दि.११/१२/२०१७ रोजी मा. आयुक्त खेबुडकर साहेब यांचेकडे मागणी परवानगी मागितली होती. मा. आयुक्त खेबुडकर साहेब यांनी दि.३०/१२/२०१७ रोजी रमामातानगर मित्र मंडळाच्या अध्यक्षांना काही शर्ती व अटी घालून वरील मागणीला परवानगी दिली होती. सदर दिले परवानगीस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- सौ.स्नेहल सावंत. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ.पद्मश्री पाटील. महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०४/२०२१

ठराव क्रमांक :- २३

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.वहिदा अय्याज नायकवडी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.२ मधील १०० फुटी रोड, इदगाह झोपडपट्टी जंक्शन ते चौगुले मळा या पुर्व-पश्चिम ८० फुटी डि.पी. रस्त्यास स्व. डॉ. पतंगराव कदम यांचे नाव देणेबाबत नागरिकांतून मागणी होत असून त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत जनहिताची केलेले कार्याची नागरिकांना सदैव प्रेरणा मिळावी तसेच त्यांच्या कार्याचे स्मरण कायम रहावे याकरीता वरील नमूद रस्त्यास स्वर्गीय डॉ. पतंगराव कदम मार्ग असे नामकरण करणेबाबत मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. उत्तम साखळकर. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ. वहिदा नायकवडी. महापौर,

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०४/२०२१

ठराव क्रमांक :- २४

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.वहिदा अय्याज नायकवडी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.२ मधील मिरज एम.आय.डी.सी. गेस्ट हाऊस कोपरा ते माधवनगर बायपास १०० फुटी रस्त्यास लोकनेते स्वर्गीय राजारामबापू पाटील यांचे नाव देणेबाबत नागरिकांतून मागणी होत असून त्यांनी त्यांच्या कारर्किदीत जनहिताची केलेले कार्याची नागरिकांना सदैव प्रेरणा मिळावी तसेच त्यांच्या कार्याचे स्मरण कायम रहावे याकरीता वरील नमूद रस्त्यास स्वर्गीय लोकनेते राजारामबापू पाटील मार्ग असे नामकरण करणेबाबत मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. उत्तम साखळकर. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ. वहिदा नायकवडी. महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०४/२०२१

ठराव क्रमांक :- २५

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.स्नेहल सचिन सावंत यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सन्मा. सदस्या सौ. स्वाती सुरेश पारधी ह्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या घड्याळ या चिन्हावर अनुसुचित जमाती प्रवर्गातून निवडूण आलेल्या आहेत. मा. अर्जुन बन्ने सदस्य सचिव, जिल्हा दक्षता नियंत्रण समिती तथा सहाय्यक आयुक्तसो समाजकल्याण सांगली यांचेकडील पत्र जा.क्र.सआसकसां/मावक/अजाआज(अप्र) अधि./२०२०-२१/५५७ दिनांक १२/०२/२०२१ रोजीच्या पत्रामध्ये समाजकल्याण समितीमधील अनुसुचित जातीच्या सदस्यासह अनुसुचीत जमातीच्या सदस्यांचा समावेश होणेकामी नियमानुसार कार्यवाही करणेबाबत सुचित केले आहे. तरी सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या समाजकल्याण समितीमध्ये सन्मा. सदस्या सौ. स्वाती सुरेश पारधी यांचा समावेश करणेबाबत प्रशासनाने नियमानुसार योग्यती पुढील कार्यवाही करावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. शेडजी मोहिते. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. राजेंद्र कुंभार.

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०४/२०२१

ठराव क्रमांक :- २६

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.आरती रविंद्र वळवडे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सहकार तपस्वी मा. खासदार स्व. गुलाबराव पाटील यांचे हे जन्मशताब्दी वर्ष ( १६ सप्टेंबर, २०२० ते १६ सप्टेंबर २०२१) आहे. स्व. गुलाबराव पाटील साहेब हे सांगली नगरीचे नगरसेवक व १९५४ ते १९५५ मध्ये नगराध्यक्ष होते. त्यांच्या कार्यकाळात हिराबाग वॉटर वर्कस्ची पाण्याची जिवनदायी योजना सांगली साठी उभारणी करण्यात आली. सांगली नगरीच्या अनेक विविध समस्या त्यांनी सोडविल्या आणि शहरातील नागरिकांच्या सोईकडे लक्ष देवून तत्कालीन एक लोकप्रिय नगराध्यक्ष म्हणून नावारुपाला आले. पुढे ते राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील विविध क्षेत्रात कार्यरत राहिले. अशा एका तपस्वी लोकनेत्याची आठवण चिरंतन राहण्याकरीता त्यांची जयंती (१६ सप्टेंबर) व पुण्यतिथी (२१ जानेवारी) रोजी घेणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- [signature] श्री. उत्तम साखळकर. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- [signature] श्री. शेडजी मोहिते. [signature] महापौर,

[signature] प्र. महापालिका सचिव
महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०४/२०२१

ठराव क्रमांक :- २८

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री. शेडजी सुबराव मोहिते व श्री. विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील तरुण भारत स्टेडियम समोरील स.नं.१०८६ या मनपाच्या खुल्या जागेमध्ये लोकनेते राजारामबापू पाटील यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणेकामी मा. महासभा क्र.०१/२०२०-२१ दि.१६/०७/२०२० विषय क्र.०७ ला अनुसरुन उपसूचनेव्दारे ठराव क्र.१० पारित केलेला होता. परंतू, सदर स.नं. १०८६ या मनपा खुल्या जागेवरील पूर्वी असलेल्या गोकूळ नाट्यगृह जागेबाबत मुंबई उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका नं.१२६७९/२०१५ चा दावा सुरु आहे. तसेच सदरील जागा मुख्य वर्दळीच्या ठिकाणी असलेमुळे वाहतुकीस ही मोठ्याप्रमाणात अडचणी निर्माण होणार आहे. तरी तरुण भारत स्टेडियम समोरील स.नं.१०८६ या मनपा खुल्या जागे ऐवजी स्टेशन रोड वरील स.नं.३४१ या मनपा जागेमध्ये लोकनेते राजारामबापू पाटील यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणेस ही सभा मान्यता देत असून पुतळा बसविणे व पुतळा परिसर व स्टेशन चौक परिसर सुशोभिकरण करुन विकसीत करणेकामी आराखडे, अंदाजपत्रक, ड्रॉईंग, डिझाईन तयार करणेकामी मनपा पॅनेलवरील अथवा अन्य कोणत्याही नामांकित व प्रसिद्ध वास्तुविशारद यांची नियुक्त करणेस व वास्तुविशारद यांची फी व इतर अनुषंगिक येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. शेडजी मोहिते ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ. वर्षा निंबाळकर D. S. Suryawanshi

महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०४/२०२१

ठराव क्रमांक :- २८

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ. वहिदा अय्याज नायकवडी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका प्रशासनातील अनेक कर्मचाऱ्यांना कामाच्या सोयी करीता प्रभारी अधिकार देणेत येत असतात. तसेच प्रत्येक विभागामध्ये विभाग प्रमुख नेमताना ते त्यांच्या तांत्रिक किंवा शैक्षणिक पात्रता व अर्हता तसेच त्यांच्या सेवाजेष्ठता यांच्या अनुषंगाने करणे आवश्यक आहे. परंतू अनेक ठिकाणी सेवाजेष्ठता, शैक्षणिक पात्रता व अर्हता यांचा विचार न करता पदभार दिलेले दिसून येतात. तसेच तात्पुरत्या स्वरुपात दिलेले नेमलेले किंवा मानधनावर असलेले कर्मचारी यांना बेदरकार अधिकार बहाल केलेचे दिसून येते ही बाब महापालिकेच्या हिताची नाही तसेच ती नैतिक अधिष्ठानात बसत नाही. सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ मधील पोट कलम १ व २ मधील तरतूदींचे काटेकोर पालन करणेत यावे. प्रत्येक विभागामध्ये विभाग प्रमुख नेमताना ते त्यांच्या तांत्रिक किंवा शैक्षणिक पात्रता व अर्हता तसेच त्यांच्या सेवाजेष्ठता यांचे मूल्यमापन करुन, नियुक्ती करणेत याव्यात. तसेच त्यांना प्रशासकीय व आर्थिक अधिकार प्रदान करणेत यावेत. याबाबत प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करावा अशी ही सभा आदेशीत करीत आहे.

सूचक :- श्री. उत्तम साखळकर. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. शेडजी मोहिते.

महापौर,

प्रशा. अधि. (आस्था)

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०४/२०२१

ठराव क्रमांक :- २९

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री. अतहर इद्रिस नायकवडी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका मिरज शहरात एकमेव असे फिश मार्केट अस्तित्वात आहे. या ठिकाणी मिरज नगरपरिषद असल्यापासून सामाजिक कार्यकर्ते मरहुम. हाजी बरकतअली पठाण हे मच्छी विक्रीचा व्यवसाय करीत होते. व्यवसाय बरोबर सामाजिक बांधिलकी देखील जपत गरजू लोकांना दवाखाना, अनाथ मुलींच्या लग्नाला मदत करणे असे अनेक सामाजिक हिताचे उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या सामाजिक कामांची प्रेरणा आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना नक्कीच उत्तेजीत करणारी असेल म्हणून मिरज मिरासाहेब दर्गा कमान मार्गावार असणारे मटण मार्केटच्या पश्चिम बाजु असणारे फिश मार्केटला हाजी बरकतअली पठाण फिश मार्केट असे नामकरण करणेकामी मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. उत्तम साखळकर ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. शेडजी मोहिते.

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०४/२०२१

ठराव क्रमांक :- ३०

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री. शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये लोकसंख्येची वाढ झपाट्याने झालेली असून कुपवाड शहरामध्ये औद्योगीक वसाहत लगत असलेले कामगार वर्ग जास्त प्रमाणात आहे तसेच सद्या चालु असलेल्या कोरोना साथीच्या रोगाच्या पार्श्वभूमीवर सदर दवाखान्याची आवश्यकता लक्षात घेता मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलची आवश्यकता आहे. कुपवाड स.नं.१७९ (जुना ४५९/२ अ + २ ब आणि ४५९/२ ब + ३ ते ५) मनपा खुली जागा येथे कम्युनिटी हेल्थ सेंटरचे बांधकाम उपलब्ध जागेच्या क्षेत्रफळानुसार G + १ (ग्राऊंड फ्लोअर + १st फ्लोअर) चे डिझाईन व इस्टीमेट तयार करणेकामी मनपा पॅनेलवरील वास्तुविशारद तायवाडे पाटील यांचेकडून सदरची कामगिरी करुन घेणेस व त्या अनुसरुन वास्तुविशारद यांची फी व इतर अनुषंगिक येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, यासोबत याबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाकडे अथवा अन्य सक्षम विभागाकडे पाठविण्यास ही सभा मान्यता देत आहे. प्रस्ताव मंजुर करताना शासनाच्या मनपा हिस्सा भरणे अथवा विविध कायदेशीर बाबींची पुर्तता करणे यासही ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. शेडजी मोहिते ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सौ. वर्षा निंबाळकर महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०१** दिनांक :- १९/०४/२०२१

ठराव क्रमांक :- ३१

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री. गजानन रामु मगदूम यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या कुपवाड शहराचे सुप्रसिध्द वस्ताद " पै. शंकर (बापू) नायकू कोकरे" यांचे दि.१९/०२/२०२१ रोजी वयाच्या ६५ व्या वर्षी हृदयविकाराने दुःखद निधन झाले. कुस्ती क्षेत्रात त्यांचा मोठा दबदबा होता. उत्तम कुस्ती पट्टू म्हणून संपूर्ण राज्यामध्ये ओळखलं जात होते. त्यांनी त्यांचे ह्यातीमध्ये श्री महादेव तालीम कुपवाड च्या माध्यमातून अनेक उत्तम कुस्ती पट्टू घडविले आहेत. खेळा बरोबरच त्यांनी राजकीय क्षेत्रातील अनेक जबाबदाऱ्या सांभाळल्या होत्या. त्यांची किर्ती भाविपिढीस प्रेरणादायी ठरावी यासाठी त्यांच्या नावाचे स्मरण होणे गरजेचे आहे. यासाठी कुपवाड मेन रोड वरुन बामणोलीकडे जाणाऱ्या रस्त्यावरील असणाऱ्या त्यांच्या निवासस्थानाजवळ असणाऱ्या चौकास "पै. शंकर (बापू) नायकू कोकरे चौक" असे नामकरण करणेकामी मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सुचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. उत्तम साखळकर. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. शेडजी मोहिते.

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक** :- ०१ दिनांक :- १९/०४/२०२१

ठराव क्रमांक :- ३२

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री. शेडजी सुबराव मोहिते यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०१९-२० मधील शासनाकडून १० कोटी प्राप्त झाले होते. त्या रक्कमेमधून आरक्षित वॉर्डातील विकासकामांची जाहिर निविदा काढण्यात आली होती. त्या निविदेमधील स्पर्धात्मक दरातून ७६,१०,२५७/- शिल्लक राहिली होती त्यातील ६७,११,६७७/- इतक्या रक्कमेची विकासकामे मा. आयुक्तसो यांच्या मान्यतेने मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पुढील मान्यतेसाठी पाठविले आहेत. त्यामुळे ८,९८,५८०/- इतकी रक्कम शिल्लक आहे. तरी सदरच्या रक्कमेमधून खालील कामगिरीचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. जिल्हाधिकारीसो यांचेकडे पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | कुपवाड वॉर्ड क्र.१ सुदर्शन कॉलनी वसंतनगर मधील वाघमारे घर ते सावंत घरापर्यंत पी.सी.सी.गटर करणे. | ८,९७,१००/- |

सूचक :- [signature] श्री. शेडजी मोहिते. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- [signature] स्नो. पद्मश्री पाटील. [signature]

महापौर,

[signature]

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका